# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ०३ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक १०/१२/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१०/१२/२०१८ सोमवार सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवान मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | कापसे मयुर चंद्रकांत |
| ढेकळे सदाशिव गणपत | पाटील प्रतिभा सुधिर |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| पोकळे दिलिप बबनराव | भंगाळे विष्णू रामदास |
| खडके सुनिल वामनराव | बरडे नितीन मनोहर |
| कोल्हे प्रविण रामदास | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| संकत चेतन गणेश | |

सदर सभेस, मा.आयुक्त,श्री.चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे उपस्थित होते.

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सभेला सुरुवात करणेत येत आहे.

**नगरसचिवः- विषय क्र. १)** दि.१५/११/२०१८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की दि.१५/११/२०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**

**नगरसचिवः- विषय क्र. २)** मनपा वाहन क्र.एम.एच.१९ एम०४३१ (टाटा इंडिगो) या वाहनाची दुरुस्ती करणेबाबत तसेच वित्तीय मर्यादेपेक्षा जास्तीच्या रक्कम रुपये ३२६५/- खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, म.न.पा. सन्मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती कार्यालयाकडील वाहन क्र.एम एच १९ एम ०४३१ (टाटा इंडिगो) हे वाहन प्रशासकीय कामकाजाकरिता सन्मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती कार्यालयाकडे कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे कामे करणे कामी सन्मा.सभापती, स्थायी समिती कार्यालयाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी क्रं.०६०१९१ दि.११/०९/२०१८ अन्वये सदर मागणी तांत्रिक तपासणी करणे कामी दि.०३/१०/२०१८ प्राप्त झालेली आहे. वाहन चालक यांच्या मागणी प्रमाणे प्रत्यक्ष पाहणी केली असता वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच १९ एम ०४३१ (टाटा इंडिगो), (उत्पादीत वर्ष जानेवारी २००९) | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्रं.** | **वाहनातील दुरुस्तीचे कामे** | | |
| १ | इंजिन ऑईल बदली करणे | ७ | चारही चाकाचे बेरींग चेक करणे |
| २ | ऑईल फिल्टर नविन टाकणे | ८ | सस्पेंशन बुशींग कीट नविन टाकणे |
| ३ | डिझेल फिल्टर नविन टाकणे | ९ | चारही डिस्कचे आऊट काढणे |
| ४ | ब्रेक ऑईल लेव्हल करणे | १० | चारही शॉकअप चेक करणे |
| ५ | पॉवर स्टेअरींग ऑईल लेव्हल करणे | ११ | वॉटर पंम्पचे बेरींग नविन टाकणे |
| ६ | मागील साईडचा दरवाजाचे काच मशिन बदलविणे | १२ | वर नमुद कामे मजुरीसह करणे |

| वर्षनिहाय दुरुस्ती खर्च | | |
|---|---|---|
| **आर्थिक वर्ष २०१६-१७ चा एकुण दुरुस्ती खर्च** | **आर्थिक वर्ष २०१७ -१८ चा एकुण दुरुस्ती खर्च** | **आर्थिक वर्ष २०१८-१९ चा एकुण दुरुस्ती खर्च** |
| हिष्ट्रीबुकनुसार रक्कम रु.६४,३२७/- | हिष्ट्रीबुकनुसार रक्कम रु.३३,५२८/- | हिष्ट्रीबुकनुसार रक्कम रु.५,९००/- |

मनपा वाहन क्रं.एम.एच १९ एम ०४३१ (टाटा इंडिगो) या वाहनाची वरील प्रमाणे दुरुस्तीची कामे करणे कामी जळगांव शहरातील तमाम अधिकृत विक्रेते / उत्पादकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार भावपत्रक न मागविता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी जळगांव महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांसाठी वेळोवेळी सुटेभाग, वेळोवेळी देखभाल दुरुस्ती, कामाची निकड लक्षात घेता जळगांव शहरातील तमाम अधिकृत विक्रेते / उत्पादक यांचेकडून डिलेव्हरी अगेंस्ट पेमेंट या तत्वावर काम करण्यास मा.स्थायी समिती ठराव क्रं.८४६ दि.१४/०२/२०१८ अन्वये समक्ष मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.२५/०९/२०१८ अन्वये सदर वाहनाचे दुरुस्तीचे व स्पेअर पार्टस खरेदी करणे कामी रक्कम रु.५७,३६५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रं.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ मंत्रालय मुंबई दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उप विभाग एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रति वर्ष ६०,०००/- मात्र वित्तीय मर्यादा निर्धरित केलेली आहे. मात्र सदर वाहनावर आर्थिक वर्ष २०१८-१९ प्रमाणे हिष्ट्रीबुक नुसार दि.२१/०८/२०१८ पावेतो रक्कम रु.५,९००/- मात्र एवढा खर्च झालेला आहे. सदर वाहनावर प्रस्तावित खर्च रक्कम रु.५७,३६५/- मात्र अपेक्षित आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु.६३,२६५/- मात्र एवढा खर्च अंदाजीत होणार आहे. तरी वित्तीय मर्यादेपेक्षा वाढीव रक्कम रु.३,२६५/- मात्रला तसेच मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु. ५७,३६५/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश / निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- अड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र.३)** म.न.पा.१७ मजली प्रशासकीय इमारतीतील पर्यायी विज पुरवठयासाठी असलेल्या ३८० KVA जनरेटरची कलम ५ (२) (२) अन्वये कंमीन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस एजन्सीकडून सर्व्हीसींग व इतर अनुषंगिक दुरुस्तीचे काम करणे तसेच जनरेटरच्या निकामी झालेल्या डी.सी.स्टार्टींग बॅटरीज नविन बसविणेकामी अंदाजीत खर्च रक्कम रु.१,६८,९६७/- मात्रचे खर्चास प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, म.न.पा. १७ मजली प्रशासकीय इमारत येथे पर्यायी विज पुरवठ्यासाठी ३८० KVA क्षमतेचे कंमीन्स कंपनीचे जनरेटर सुमारे ८ वर्षापुर्वी बसविण्यात आलेले आहे. सदर जनरेटरची आवश्यकतेनुसार वेळोवेळी नियमित कंमीन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस एजन्सीकडुन सर्व्हीसींगचे काम करण्यात येत असते. तसेच सदर जनरेटरच्या १२ Volt, 100 AH PULSE LITE2 नग स्टार्टींग डी.सी.बॅटरीज निकामी झालेल्या आहेत. सदर स्टार्टींग बॅटरीज देखील नविन बसविणे आवश्यक आहे.

कंमीन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस एजन्सी असलेले 'ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अन्ड सर्व्हीसेस' औरंगाबाद यांचे जळगांव कार्यालयातील, टेक्नीशियन, / प्रतिनिधी यांनी जनरेटरची तपासणी केली असता जनरेटरचे सर्व्हीसींग सोबत काही अनुषंगिक कामे करणे आवश्यक असल्याचे त्यांनी त्यांचे दि.०४/०९/२०१८ चे कंमीन्स फील्ड रिपोर्ट मध्ये नमुद केलेले आहे. सदर कंमीन्स फिल्ड रिपोर्ट विभाजकात जोडण्यात आलेला आहे. सदर दि.०४/०९/२०१८ चे रिपोर्ट नुसार करावयाचे कामाचा एकुण रक्कम रु.१,६८,९६७/- चा प्रोफॉर्मा इन्व्हाईस पार्ट –A, पार्ट –B, पार्ट –C नुसार एकत्रित मक्तेदार'ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अन्ड सर्व्हीसेस' यांनी म.न.पा. कडे सादर केलेला असुन सविस्तर तपशिल टिपणीत नमुद करण्यात आलेला आहे. अधिकृत वितरक यांनी कार्यादेशासोबतच १०० टक्के आगाऊ रक्कमेची मागणी केलेली आहे.

तरी सदरचे काम करणे आवश्यक असुन सदरचे काम विद्युत विभागांतर्गत प्र.सं.क्र.१ जनरेटर व्यवस्था व दुरुस्ती व ट्राफिक सिग्नल व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली करता येईल.

तरी म.न.पा.प्रशासकीय इमारतीतील ३८० KVA कंमीन्स कंपनीच्या जनरेटरची अनुषंगिक आवश्यक दुरुस्ती व सर्व्हीसींग करण्याचे काम कंमीन्स कंपनीचे अधिकृत एजन्सी / वितरक 'ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अन्ड सर्व्हीसेस' औरंगाबाद यांचेकडुन म.न.पा. अधिनियम १९४९ संविदा प्रकरण ५ मधील नियम २(२) चे परंतुकात नमुद तरतुदी अन्वये निविदा न मागविता त्यांचे प्रोफॉर्मा इन्व्हाईस नुसार काम करुन घेण्यास व त्याकामी प्रोफार्मा इन्व्हाईसनुसार एकुण रक्कम रु. १,६८,९६७/- चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- संकत चेतन गणेश**
**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र.४)** Gem पोर्टलवरुन १४ cum Garbage Compactor on LPT १६१३६९७ TCIC/४२, BSIV ७ नग खरेदी करणेचे कामी सर्वात सर्वात कमीचे दर रक्कम रु.२,५३,५६,७५३/- प्राप्त L१ निविदाधारक Kam-Avida Enviro Engineering Services यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) च्या अनुषंगाने प्रस्तावीत GeM पोर्टलवर प्रस्तावीत 7 नग 14 cum क्षमतेचे garbage Compactor खरेदी करणेस मा. आयुक्त यांचे दि.01/09/2018 रोजीचे प्रशासकिय मान्यता नुसार उक्त कामाची online bidding क्रं. GEM/2018/B/79155 दि.03-09-2018 रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ www.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. GeM पोर्टलवर दि.03/09/2018 पासून ते दि.14/09/2018 संध्या. 6.00 वाजेपावेतो विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झालेल्या 9 online Bid (ई-निविदा) खालील प्रमाणे आहेत.

1. mmn Trading and equipement pvt.ltd. 2. Tata Motars 3. Urban Envirotech Service Pvt.Ltd 4. Kores(India) Ltd 5. Kam-Avida Enviro Engineering Services 6. Sadhna Enviro Engineering Services 7. Central Avenue Trading Comapany Pvt Ltd 8. Jaika Motars 9. Amisto Enviro Equipments pvt.Ltd

प्रस्तुत कामासाठी GeM पोर्टलवर प्रस्तावीत 7 नग 14 cum क्षमतेची garbage Compactor खरेदी करणे कामी मा. आयुक्त यांचे दि.18/09/2018 चे मान्यतेने प्राप्त झालेल्या 9 online निविदा धारकांचे Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी केली असता खालील 4 निविदाधारक हे निविदेतील नमुद ठळक टेक्निकल पॅरामिटरर्सची पुर्तता करीत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तांत्रिक कारणांस्तव खालील 4 निविदाधारकांना अपात्र करणे उचित होईल, असे या विभागाचे स्पष्ट मत आहे.

| अ क्र | Bid Requirement | mmn Trading and equipement pvt.ltd | Urban Envirotech Service Pvt.Ltd | Central Avenue Trading Comapany Pvt Ltd | Amisto Enviro Equipments pvt.Ltd |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Vehicle engine capacity should not be less than **5675cc** | 3783cc | 3783cc | 5675cc | 5675cc |
| 2 | Pay load capacity should not be less than **11.25 totnnes** | 8 | 9 | 11 | 11 |
| 3 | Max Engine BHP should be **135** | 125 | 125 | 134 | 136 |
| 4 | Electrically Hydraulic Control | No | No | No | No |

तसेच पुढील 5 निविदाधारक हे वर नमुद केलेल्या टेक्निकल पॅरामिटरसची पुर्तता करीत आहेत. 1. Tata Motars 2. Kores(India) Ltd 3. Kam-Avida Enviro Engineering Services 4. Sadhna Enviro Engineering Services 5. Jaika Motars तथापी bid Requirement नुसार पुरवठादार यास किमान 6 वर्षाचा शासकिय अनुभव तसेच रुपये 1010 लाख इतका सरासरी टर्नओव्हर असणे नमुद आहे.

| Sr. No | Bid Requirement | Tata Motors | Kores India | Kam- Avida | Sadhna Enviro Engineering Services | Jaika Motors |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Govt.Exp.with 6 years | Exp.of 1 Years and 4 month only | Exp.of 2 Years and 6 month only | Exp.of more than 8 years with govt. | Exp.of 4 Yeara and 6 month only | Not Avaliable/Provided |
| 2 | Annual turnover not less than 1010 lakh | 49315 lakh | 6930 lakh | 3874 lakh | 1363 lakh | Not Avaliable/Provided |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने पुरवठादार (bidder) Tata Motors, Kores India, Sadhna Enviro Engineering Services, Jaika Motors हे Bid Requirement नुसार 6 वर्षाचा शासकिय अनुभव अथवा रु.10.10 लाख इतका टर्न ओवरच्या पात्रतेचे निकष यांची पुर्तता करीत नसल्यामुळे अपात्र करणे उचित होईल. तथापी उवरित bidder (पुरवठादार), Kam- Avida Bid Requirement ची पुर्तता करीत असून Kam- Avida या पुरवठादाराने लोकल सर्व्हिस देणार असल्याचे लेखी स्वरुपात दस्तऐवज सादर केले आहे. त्या अनुषंगाने Kam- Avida हे पुरवठादार Technical Bid छाननी अंती प्रथमदर्शनी पात्र ठरत असल्याने मा. आयुक्त यांचे दि.02/11/2018 चे मान्यतेने वाहन विभाग प्रमुख यांचे समक्ष Financial Bid Open केले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L1 निविदाधारक Kam- Avida Enviro Engineering यांची रक्कम रु.2,53,56,753/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (Work-Order) देणेस म.न.पा.अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश /निर्देशानुसार आवश्यक त्या बाबीची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १४ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :-** **संकत चेतन गणेश**

**अनुमोदक :-** **कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** Gem पोर्टलवरुन प्रस्तावीत ७५ नग ३.५ cum क्षमतेचे लोखंडी कचरा कंटेनर (Garbage Container) खरेदी कामीचे दर रक्कम रु.३६,७५,०००/- प्राप्त L१ निविदाधारक DEVENDRA ENTERPRISES यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प विस्तृत अहवालात (DPR) लोखंडी कचरा कंटनेर (Garbage Container) खरेदी करणेची तरतूद नसल्याने मा. महासभा ठराव क्रं.731 दि.09/08/2017 अन्वये 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून GeM पोर्टलवरुन प्रस्तावीत 75 नग 3.5 cum क्षमतेचे कचरा कंटेनर (Garbage Container) खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी दि.18/09/2018 रोजी प्रशासकिय मान्यता नुसार उक्त कामाची online bidding क्रं. GEM/2018/B/111116 दि.28-10-2018 रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ www.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

GeM पोर्टलवर दि.28/10/2018 पासून ते दि.08/11/2018 दुपारी 3.00 वाजेपावेतो विहित केलेल्या मुदतीत पुढील प्रमाणे 7 online Bid (ई-निविदा) सदरील संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहेत. 1.TIRUPATI RICKSHAW TRADERS 2.A.B.INFRASTRUCTURE LTD 3.SHILPI ENGINEERING WORKS 4.GUSTO PHARMA 5.P.S.UDYOG 6.DEVENDRA ENTERPRISES 7.AMAN CLEANING EQUIPMENT PVT.LTD

प्रस्तुत कामासाठी GeM पोर्टलवर प्रस्तावीत 75 नग 3.5 cum क्षमतेचे कचरा कंटेनर (Garbage Container) खरेदी करणे कामी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या 7 online bidder (निविदा धारकांचे) मा. आयुक्त यांचे दि.15/11/2018 चे मान्यतेने Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी खालील प्रमाणे आहे.

| Bidder Name | Technical Eligibility | Govt.Exp with 8 Years and |
|---|---|---|

| | | Annual Turnover of 110 lakh |
|---|---|---|
| TIRUPATI RICKSHAW TRADERS | Not Eligible | Not Eligible |
| A.B.INFRASTRUCTURE LTD | Eligible | Not Eligible |
| SHILPI ENGINEERING WORKS | Eligible | Not Eligible |
| GUSTO PHARMA | Eligible | Not Eligible |
| P.S.UDYOG | Not Eligible | Not Eligible |
| DEVENDRA ENTERPRISES | Eligible | Eligible |
| AMAN CLEANING EQUIPMENT PVT.LTD | Eligible | Not Eligible |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने निविदाधारक 1. DEVENDRA ENTERPRISES हे वर नमुद केलेल्या टेक्निकल पॅरामिटरसची पुर्तता करीत असून निविदांचे Technical Bid छाननी अंती प्रथमदर्शनी पात्र ठरत असल्याने मा. आयुक्त यांचे दि.18/11/2018 चे मान्यतेने सदर निविदाधाराकांचे financial Bid समक्ष उघडले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L1 निविदाधारक DEVENDRA ENTERPRISES यांची रक्कम रु.36,75,000/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (Work Order) देणेस म.न.पा.अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- संकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** Gem पोर्टलवरुन प्रस्तावीत २५ नग ४.५ cum क्षमतेचे लोखंडी कचरा कंटेनर (Garbage Container) खरेदी कामीचे दर रक्कम रु.१३,५०,०००/- प्राप्त L१ निविदाधारक DEVENDRA ENTERPRISES यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प विस्तृत अहवालात (DPR) लोखंडी कचरा कंटनेर (Garbage Container) खरेदी करणेची तरतूद नसल्याने मा. महासभा ठराव क्रं. 731 दि.09/08/2017 अन्वये 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून GeM पोर्टलवरुन प्रस्तावीत 25 नग 4.5 cum क्षमतेचे लोखंडी कचरा कंटनेर (Garbage Container) खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी दि.18/09/2018 रोजीच्या प्रशासकिय मान्यता नुसार उक्त कामाची online bidding क्रं. GEM/2018/B/111118 दि.28-10-2018 रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ www.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

GeM पोर्टलवर दि.28/10/2018 पासून ते दि.08/11/2018 दुपारी 4.00 वाजेपावेतो विहित केलेल्या मुदतीत पुढील प्रमाणे 6 online Bid (ई-निविदा) सदरील संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहेत. 1.TIRUPATI RICKSHAW TRADERS 2.A.B.INFRASTRUCTURE LTD 3.SHILPI ENGINEERING WORKS 4.GUSTO PHARMA 5.DEVENDRA ENTERPRISES 6.AMAN CLEANING EQUIPMENT PVT.LTD

प्रस्तुत कामासाठी GeM पोर्टलवर प्रस्तावीत 25 नग 4.5 cum क्षमतेचे लोखंडी कचरा कंटनेर (Garbage Container) खरेदी करणे कामी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या 6 online bidder (निविदा धारकांचे) मा. आयुक्त यांचे दि.15/11/2018 चे मान्यतेने Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी खालील प्रमाणे आहे.

| Bidder Name | Technical Eligibility | Govt.Exp with 8 Years and Annual Turnover of 69 lakh |
|---|---|---|
| TIRUPATI RICKSHAW TRADERS | Eligible | Eligible |
| A.B.INFRASTRUCTURE LTD | Not Eligible | Not Eligible |
| SHILPI ENGINEERING WORKS | Eligible | Not Eligible |
| GUSTO PHARMA | Eligible | Not Eligible |
| DEVENDRA ENTERPRISES | Eligible | Eligible |
| AMAN CLEANING EQUIPMENT PVT.LTD | Eligible | Not Eligible |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने पुढील 2 निविदाधारक 1. TIRUPATI RICKSHAW TRADERS 2. DEVENDRA ENTERPRISES हे वर नमुद केलेल्या टेक्निकल पॅरामिटरसची पुर्तता करीत असून निविदांचे Technical Bid छाननी अंती प्रथमदर्शनी पात्र ठरत असल्याने मा. आयुक्त यांचे दि.18/11/2018 चे मान्यतेने सदर निविदाधाराकांचे financial Bid समक्ष उघडले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L1 निविदाधारक DEVENDRA ENTERPRISES यांची रक्कम रु.13,50,000/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (Work Order) देणेस म.न.पा.अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (ड) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- संकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. ७)** Gem पोर्टलवरुन प्रस्तावीत २ नग JCB २DX Backhoe Loader with Cabin with ६ in १ Loader Bucket खरेदी करणे कामीचे दर रक्कम रु.३,५८,०००/- प्राप्त L१ निविदाधारक ACTION CONSTRUCTION EQUIPMENT LIMITED यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) च्या अनुषंगाने प्रस्तावीत GeM पोर्टलवर प्रस्तावीत 2 नग JCB 2DX Backhoe Loader with Cabin With 6 in 1 Loader Bucket खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी दि.16/10/2018 रोजी प्रशासकिय मान्यता नुसार उक्त कामाची online bidding क्रं. GEM / 2018 / B / 106214 दि.17-10-2018 रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ www.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. GeM पोर्टलवर दि.17/10/2018 पासून ते दि.27/10/2018 संध्या. 6.00 वाजेपावेतो विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झालेल्या 3 online Bid (ई-निविदा) खालील प्रमाणे आहे.

1. ACTION CONSTRUCTION EQUIPMENT LIMITED 2. CASE BEW GIKKABD CIBSTRUCTION EQUIPMENT(INDIA) PRIVATE LIMITED 3. TATA HITACHI CONSTRUCTION MACHINERY COMPANY PVT.LTD

प्रस्तुत कामासाठी GeM पोर्टलवर प्रस्तावीत 2 नग JCB 2DX Backhoe Loader with Cabin With 6 in 1 Loader Bucket खरेदी करणे कामी मा. आयुक्त यांचे दि.30/10/2018 चे मान्यतेने विहित मुदतीत प्राप्त झालेल्या 3 online निविदा धारकांचे Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी केली असता खालील 1. CASE BEW GIKKABD CIBSTRUCTION EQUIPMENT(INDIA) PRIVATE LIMITED 2. TATA HITACHI CONSTRUCTION MACHINERY COMPANY PVT.LTD निविदाधारक हे निविदेतील नमुद ठळक टेक्निकल पॅरामिटरर्सची पुर्तता करीत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तांत्रिक दृष्टया खालील 2 निविदाधारकांना अपात्र करणे उचित होईल, असे या विभागाचे स्पष्ट मत आहे.

| अ. क्र. | Bid Requirement | ACTION CONSTRUCTION EQUIPMENT LIMITED | CASE BEW GIKKABD CIBSTRUCTION EQUIPMENT(INDIA) PRIVATE LIMITED | TATA HITACHI CONSTRUCTION MACHINERY COMPANY PVT.LTD |
|---|---|---|---|---|
| 1 | Vehicle engine capacity should not be less than **4160cc** | 4160cc | 4100c | 3784cc |
| 2 | Excavator Bucket Digging Depth should not be less than **4.7 meter** | 4.7 | 4.3 | 4.2 |
| 3 | Max Engine BHP should be **76** | 76 | NA | NA |
| 4 | Bucket Digging Force | 5700 | NA | NA |
| 5 | Excavatir Bucket Capacity Sholuld be 0.26cum | 0.26 | NA | NA |

तसेच पुढील 1 निविदाधारक ACTION CONSTRUCTION EQUIPMENT LIMITED हे वर नमुद केलेल्या टेक्निकल पॅरामिटरसची पुर्तता करीत असून निविदांचे Technical Bid छाननी अंती प्रथमदर्शनी पात्र ठरत असल्याने मा. आयुक्त यांचे दि.15/11/2018 चे मान्यतेने सदर निविदाधाराकांचे financial Bid वाहन विभाग प्रमुख यांचे समक्ष उघडले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L1 निविदाधारक ACTION CONSTRUCTION EQUIPMENT LIMITED यांची रक्कम रु.39,58,000/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (Work Order) देणेस म.न.पा.अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १४ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- संकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. ८)** Gem पोर्टलवरुन प्रस्तावीत २ नग फिरते शौचालय खरेदी करणे कामीचे दर रक्कम रु.११,३०,०००/- प्राप्त L१ निविदाधारक DEVENDRA ENTERPRISES यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प विस्तृत अहवालात (DPR) फिरते शौचालय (Mobile Toilet Van) खरेदी करणेची तरतूद नाही. तथापी महानगरपालिकेकडे फिरते शौचालय उपलब्ध नसल्याने जळगांव शहरातील विविध सार्व. कार्यक्रम (शासकिय, अध्यात्मिक, सांस्कृतीक कार्यक्रम इ.) करीता सदर सुविधा म.न.पा.कडे उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या कामकाजाबाबत नाराजी तसेच स्वच्छ अभियाना अंतर्गत अमलबजावणी कामी आवश्यक असल्याने GeM पोर्टलवर प्रस्तावीत 2 नग फिरते शौचालय (Mobile Toilet Van) खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी दि.10/10/2018 रोजी प्रशासकिय मान्यता नुसार उक्त कामाची online bidding क्रं. GEM/2018/B/109233 दि.24/10/2018 रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ www.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. GeM पोर्टलवर दि.24/10/2018 पासून ते दि.05/11/2018 रात्री 8.00 वाजेपावेतो विहित केलेल्या मुदतीत खालील 13 online Bid (ई-निविदा) प्राप्त झालेल्या आहेत.

1. MMN TRADING AND EQUIPMENT PVT.LTD 2. SHYAM BAG COMPANY 3. SHIVPRIYA INDUSTRIES 4. MILLENIUM TECHNOLOGY 5. CBS TECNOLOGIES PVT.LTD 6. ATO Z SOLUTION 7. IOTA ENGINEERING CORPORATION 8. DEVENDRA ENTERPRISES 9. SAPNA AND BROTHERS 10. ANCHOR CONTAINER SERVICES PVT.LTD 11. MSD ENTERPRISES 12. SIYARAM SALES CORPORATION 13. PRINCE ENTERPRISES

प्रस्तुत कामासाठी GeM पोर्टलवर प्रस्तावीत 2 नग फिरते शौचालय (Mobile Toilet Van) खरेदी करणे कामी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या 13 online bidder (निविदा धारकांचे) मा. आयुक्त यांचे दि.15/11/2018 चे मान्यतेने Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी केली असता खालील 10 निविदाधारक हे निविदेतील नमुद ठळक टेक्निकल पॅरामिटरर्सची पुर्तता करीत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तांत्रिक कारणांस्तव खालील तक्त्यातील 10 निविदाधारकांना अपात्र करणे उचित होईल, असे या विभागाचे स्पष्ट मत आहे.

| अ. क्र. | Name of the Bider | Indian with steel base | Side panel material 18 guage aluminium sheet | Top panel Material zero spangled cold rolled 120 GSM | Door Panel Material 18 Guage aluminium sheet | Partition panel material zero spangled cold rolled 120GSM |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MMN TRADING AND EQUIPMENT PVT.LTD | Yes | No | No | No | No |
| 2 | SHYAM BAG COMPANY | Yes | No | No | Yes | Yes |
| 3 | SHIVPRIYA INDUSTRIES | Yes | No | No | Yes | Yes |
| 4 | MILLENIUM TECHNOLOGY | Yes | No | No | No | No |
| 5 | **CBS TECNOLOGIES PVT.LTD** | **Yes** | **Yes** | **Yes** | **Yes** | **Yes** |
| 6 | A TO Z SOLUTION | Yes | No | No | No | No |
| 7 | KOTA ENGINEERING CORPORATION | No | No | No | No | No |

| अ. क्र. | Name of the Bider | Indian with steel base | Side panel material 18 guage aluminium sheet | Top panel Material zero spangled cold rolled 120 GSM | Door Panel Material 18 Guage aluminium sheet | Partition panel material zero spangled cold rolled 120GSM |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | **DEVENDRA ENTERPRISES** | **Yes** | **Yes** | **Yes** | **Yes** | **Yes** |
| 9 | SAPNA AND BROTHERS | No | No | No | No | No |
| 10 | ANCHOR CONTAINER SERVICES PVT.LTD | Yes | No | No | No | No |
| 11 | MSD ENTERPRISES | Yes | No | No | No | Yes |
| 12 | **SIYARAM SALES CORPORATION** | **Yes** | **Yes** | **Yes** | **Yes** | **Yes** |
| 13 | PRINCE ENTERPRISES | Yes | No | No | Yes | Yes |

तसेच पुढील 3 निविदाधारक 1. CBS TECNOLOGIES PVT.LTD २. DEVENDRA ENTERPRISES 3. SIYARAM SALES CORPORATION वर नमुद केलेल्या टेक्निकल पॅरामिटरसची पुर्तता करीत असल्याने मा. आयुक्त यांचे दि.01/12/2018 चे मान्यतेने सदर निविदाधाराकांचे financial Bid समक्ष उघडले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L1 निविदाधारक DEVENDRA ENTERPRISES यांची रक्कम रु.11,30,000/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (Work Order) देणेस म.न.पा.अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- संकत चेतन गणेश**
**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. ९)** Gem पोर्टलवरुन प्रस्तावीत २ नग TIPPER LPK १६१३ BS IV खरेदी करणे कामीचे दर रक्कम रु.३१,७९,४८२/- प्राप्त L१ निविदाधारक Tata motors limited यांना कार्यादेश (Work Order) देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) च्या अनुषंगाने प्रस्तावीत GeM पोर्टलवर प्रस्तावीत 2 नग TIPPER LPK 1613 BS IV खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी दि.16/10/2018 रोजी प्रशासकिय मान्यता नुसार उक्त कामाची online bidding क्रं. GEM / 2018 / B / 106413 दि.17/10/2018 रोजी केंद्र सरकारच्या संकेत स्थळ www.GeM.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. GeM पोर्टलवर दि.17/10/2018 पासून ते दि.27/10/2018 रात्री. 8.00 वाजेपावेतो विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झालेल्या 2 online Bid (ई-निविदा) खालील प्रमाणे आहे.
1.Tata motors limited 2. Gourika India Limited

प्रस्तुत कामासाठी GeM पोर्टलवर प्रस्तावीत 2 नग TIPPER LPK 1613 BS IV खरेदी करणे कामी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या 2 online bidder (निविदा धारकांचे) मा. आयुक्त यांचे दि.30/10/2018 चे मान्यतेने Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी केली असता खालील 1 निविदाधारक हे निविदेतील नमुद ठळक टेक्निकल पॅरामिटरर्सची पुर्तता करीत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तांत्रिक कारणांस्तव खालील 1 Gourika India Limited निविदाधारकास अपात्र करणे उचित होईल, असे या विभागाचे स्पष्ट मत आहे.

| अ.क्र. | Bid Requirement | Tata motora limited | Gourika India Limited |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Vehicle engine capacity should not be less than **5675cc** | 5675cc | 5675cc |
| 2 | Type of Steering | Power Operated | Manual |
| 3 | Max Engine BHP should be **133** | 133 | 133 |

तसेच पुढील 1 निविदाधारक Tata Motors वर नमुद केलेल्या टेक्निकल पॅरामिटरसची पुर्तता करीत असल्याने मा. आयुक्त यांचे दि.02/11/2018 चे मान्यतेने सदर निविदाधाराकांचे financial Bid समक्ष उघडले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L1 निविदाधारक Tata motors limited यांची रक्कम रु.31,79,482/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (Work Order) देणेस म.न.पा.अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- संकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. १०)** म.सभापती स्थायी समिती महानगरपालिका, जळगांव यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र./सभापती,स्थायी समिती कार्यालय/०३/२०१८ दि.०३/११/२०१८ चे पत्रान्वये महानगरपालिकेच्या दैनंदिन कामी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रकारची स्टेशनरीवर उदा. कार्ड फाईल, लेटर हेड मोठे व लहान, टिप्पणीचे कागद, अदायगीचे देयके, पत्र व्यवहाराचे संपुर्ण कागदपत्रे यावरील जळगांव शहर महानगरपालिका या मधील १७ मजली इमारतीच्या खाली सरदार वल्लभभाई पटेल टॉवर अशी दुरुस्ती होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

*** (सदर विषय दिनांक ०७/१२/२०१८ रोजीचे महासभेत घेण्यात आलेला असल्याने रद्द करण्यात येत आहे.)**

**नगरसचिव:- विषय क्र. ११)** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत जळगाव शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प (सन २०१७-१८) योजने अंतर्गत मौजे निमखेडी गट नं.११२/१/१/२ व गट नं.११२/१/१/३ येथील खुल्याजागेत हरीत क्षेत्र विकसित करणे कामी मक्तेदार पद्मालय कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.६०% कमीचे दर रक्कम रु.२७,४६,७९७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत जळगाव शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प (सन २०१७-१८) योजनेस महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- अमृत २०१६/प्र.क्र.१८७/नवि-३३, दिनांक १६ सप्टेंबर २०१७ अनुसार प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांचे दिनांक २९/०९/२०१७ रोजीच्या मान्यतेनुसार मौजे निमखेडी गट नं.११२/१/१/२ व गट नं.११२/१/१/३ येथील खुल्याजागेत हरीत क्षेत्र विकसित करणे कामी रक्कम रु.२७,६३,३७७/- मात्र ची ई-निविदा सुचना क्रं.७९६/२०१७ ही महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात दि.०६/१०/२०१७ रोजी तसेच दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वर्तमान पत्रात दि.०६/१०/२०१७ रोजी जाहीर करण्यात आलेली होती. सदर ई-निविदा सुचना मध्ये मुदतीत फक्त ०१ ई-निविदा संकेतस्थळावर प्राप्त झाल्याने ०५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरी उक्त निविदेस मुदतवाढ देऊन ०३ ई-निविदा प्राप्त झाली. तथापी सदर निविदा कामी लिफाफा क्रं.१व२ उघडण्यात आले असता त्यापैकी लिफाफा क्रं.०१ मध्ये सर्व कागदपत्रे आढळून आली, तफापी सदर कागदपत्रांपैकी Collaboration Agreement वर तीनही पक्षांच्या स्वाक्षरी नसल्याचे दिसुन आले व प्रतिज्ञापत्र अपुर्ण असल्याचे दिसुन आले. सदर कामांमध्ये काम कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे अधिकार निविदा सुचनेनुसार महानगरपालिकेस असल्याने सदरच्या कामास दुसऱ्या व तिसऱ्या वेळेस फेर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. मुदतीत एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने निविदा प्रक्रियेस प्रतिसाद मिळत नसल्याने सदर निविदा रद्द करुन अल्पावधीची फेर निविदा चौथ्या वेळेस फेर निविदा सुचना क्रं.१०९९ जिल्हास्तरीय वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यात आली त्याची माहिती दै.दिव्य मराठी जिल्हास्तरीय दि.१५/०८/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत ०१ निविदा प्राप्त झाली. तरी दिलेल्या मुदतीत एकूण ०१ निवीदा प्राप्त झाल्याने महाराष्ट्र शासन, सार्वजनीक बांधकाम विभाग, शासन निर्णय ,क्रमांक-सीएटी २०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दि.१२ एप्रिल २०१७ नुसार चौथ्या वेळेस फेर निविदेलाही तीनपेक्षा कमी संख्येचे देकार प्राप्त झाल्यास मुख्य अभियंता यांनी याबाबत देकार उघडयाबाबत निर्णय घेऊन सक्षम प्राधिकाऱ्याकडे मंजुरीबाबत पाठविण्याचे निर्देश आहेत.

उक्त ई-निविदा सुचना क्र.१०९९/२०१७ मध्ये एकुण ०१ धारकांनी सहभाग घेतल्याने उक्त निवीदा बीड लॉक करण्यात आलेली होती एकूण .१ निविदा धारकांचे बीड सबमिशन पुर्ण झालेले असल्याने लिफाफा क्रं.०१ उघडणेबाबत म.निविदा समिती यांचे समक्ष उघडण्यात आले असता ०१ मक्तेदारांचे उक्त कामाचे झालेली ई-निविदा कागदपत्राची छाननी केल्यानुसार त्यात मक्तेदार पद्मालय कन्स्ट्रक्शन यांनी निविदेत नमुद प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन दिलेली असल्याने त्यांची एकमेव निविदा लिफाफा क्रं.०२ उघडून मक्तेदार पद्मालय कन्स्ट्रक्शन यांचे दर निविदा रक्कमेपेक्षा ०.६०% कमीचे आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.२७,४६,७९७/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर रक्कमेपैकी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे खर्च करावा लागणार आहे.

| अमृत योजने अंतर्गत हरीत क्षेत्र निधितून केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी | अमृत योजने अंतर्गत हरीत क्षेत्र निधितून राज्य शासनाने वितरीत केलेला निधी | अमृत योजने अंतर्गत हरीत क्षेत्र निधितून मनपा निधितून करण्यात आलेला खर्च |
|---|---|---|
| ५०% | २५% | २५% |
| १३,७३,३९९/- | ६,८६,,६९९/- | ६,८६,,६९९/- |

तरी सदर कामी प्रस्तावीत केलेल्या कामाचे मक्तेदार पद्मालय कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.६०% कमीचे दर असल्याने रक्कम रु.२७,४६,७९७/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १४ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- अड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र.१२)** महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ एम ९२१२ (कॉम्पॅक्टर) या वाहनाची मेजर दुरुस्ती करणे कामी रक्कम रु.३,६१,९५६/- मात्र खर्चास तसेच वित्तीय मर्यादेपेक्षा जास्तीच्या येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्र. एम एच 19 एम 9212 (कॉम्पॅक्टर) हे वाहन नागरीकांच्या मुलभुत सुविधेकरीता अत्यावश्यक सेवेतील आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे काम करणे कामी आरोग्य विभागाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी क्र.4318, दि.03/09/2018 अन्वये सदर मागणी तांत्रिक तपासणी करणे कामी दि.03/09/2018 रोजी प्राप्त झालेली आहे. वाहन चालक यांच्या मागणी प्रमाणे प्रत्यक्ष पाहणी केली असता वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| **मनपा वाहन क्र. एम एच 19 एम 9212 (कॉम्पॅक्टर), (उत्पादीत वर्ष डिसेंबर-2010)** | |
|---|---|
| **अ.क्र.** | **वाहनातील दुरुस्तीचे कामे** |
| 1 | Ejecter plate cylinder new fitting -01 nos |
| 2 | Satpiliser Cylinder hauling -02 nos |
| 3 | Mobile Counter value overhaul -03 nos |
| 4 | Male female palte cylinder hauling -02 nos |
| 5 | Hydraulic Oil Change 120 Ltrs |
| 6 | General patch work -01 nos |
| 7 | Male female plate slider patti -06 nos |
| 8 | Male female plate alignment -01 nos |
| 9 | Sliding vlock new fitting |
| 10 | Driver Side Glass fitting with rubber |
| 11 | RTO Passing work |
| 12 | All glass rubber bidaling & new fitting |
| 13 | Filter set new fitting |

| **वर्षनिहाय दुरुस्ती खर्च** | | |
|---|---|---|
| **एम एच 19 एम 9212** | | |
| **आर्थिक वर्ष 2016-17 चा एकुण दुरुस्ती खर्च** | **आर्थिक वर्ष 2017-18 चा एकुण दुरुस्ती खर्च** | **आर्थिक वर्ष 2018-19 चा आजपावेतोचा दुरुस्ती खर्च** |
| हिष्ट्रीबुकनुसार रक्कम रु.2,18,213/- | हिष्ट्रीबुकनुसार रक्कम रु.78,385/- | हिष्ट्रीबुकनुसार रक्कम रु.2,770/- |

महानगरपालिका आरोग्य विभागाकडील क्र. एम एच 19 एम 9212 (कॉम्पॅक्टर) हे वाहन शहरातील कचरा वाहतुक करणे कामी अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाची प्रत्यक्ष पाहणी केली असता व वाहन चालक यांच्या मागणीनुसार वरील प्रमाणे दुरुस्तीची कामे मजुरीसह तात्काळ करणे गरजेचे आहे. अधिकृत वितरक व मॅनीफॅक्चरर असलेले मे.आवटे फॅब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल्स वर्क्स पुणे यांचेकडील कोटेशन नं.36, दि.03/09/2018 अन्वये दुरुस्ती खर्च रक्कम रु.3,61,956/- मात्र खर्च अपेक्षित आहे.शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक.विअप्र-1008/प्र.क्र.70/2008/विनिमय, दि.15 मे 2009 चे परिशिष्ठ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978 भाग पहिला उप-विभाग - दोन महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र:विअप्र-2013/प्र.क्र.30/2013/विनिमय, भाग-2 दि.17 एप्रिल 2015 अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला, उप विभाग-एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार डिझेलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रति वर्षी रु.60,000/- पर्यंत मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त झालेले कोटेशन नं.36, दि.03/09/2018 अन्वये दुरुस्ती खर्च रक्कम रु.3,61,956/- मात्रला प्रशासकीय मान्यता देणेस हरकत नसावी तसेच सदर दर हे बाजारभावाशी सुसंगत असुन वाजवी आहेत. सदर वाहन हे वर्ष डिसेंबर-2010 चे असुन वाहन चेसीस खरेदी किंमत रक्कम रु.14,60,330/- मात्र व बांधणी खर्च रक्कम रु.1300400/- असे एकुण रक्कम रु.27,60,730/- मात्र कॉम्पॅक्टरची मुळ किंमत आहे. मुळ किंमतीवर दुरुस्ती खर्च रक्कम रु.3,61,956/- मात्रच्या खर्चास मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 5 (2) (2) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १४ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- अड पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र.१३)** भविष्य निधी संघटन कार्यालय नाशिक सुनावणी साठी व कोर्टात बाजु मांडणे साठी अड.श्री.जी.आर.देशपांडे,अकोला यांची नियुक्ती करणेस व त्यांच्या फी रक्कम रु.४ लक्ष मात्र अदायगीस मंजूरी मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे रोजंदारी कर्मचारी व मक्तेदार यांचे बाबत भविष्य निधी संघटन कार्यालय नाशिक येथे आयुक्त कार्यालयात सुनावणीत सदर आयुक्त कार्यालयाने म.न.पा.रोजंदारी कर्मचारी यांची भविष्य निधीची रक्कम उशिरा भरणा केल्याने दंड व व्याज रु.१,२७,३०,२९९/-मात्रची आकारणी केलेले असल्याने त्या बाबत बाजु मांडणे कामी आकोला येथील अड.जी.आर.देशपांडे यांनी ६ लक्ष मात्रची फी सादर केलेली होती. मात्र मा.आयुक्त सो.,यांनी चर्चा करुन रु.४ लक्ष मात्रची फी बाबत मंजुरी दिलेली आहे. तरी सदर खर्चास मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- अड पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. १४)** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडीमधील शिक्षिका व मदतनिस यांना दि.१ डिसेंबर २०१८ या एक दिवसाचा खंड देऊन पुढील मानधन तत्वावरील आदेश दि.२ डिसेंबर २०१८ ते १५ एप्रिल २०१९ पावेतो होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेमी इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीतील २१ शिक्षिका व १० मदतनिस तसेच मराठी माध्यमाच्या बालवाडीतील १० शिक्षिका व १२ मतदतनिस असुन यांना १ डिसेंबर २०१८ असा एक दिवसाचा खंडे देऊन दि.२ डिसेंबर २०१८ ते १५ एप्रिल २०१९ पावेतो मानधन तत्वावरील नियुक्त आदेश देणे असलने अधिनियम १९४९ चे कलम १९४९ चे कलम ५३ मधिल तरतुदिनुसार नविन नियुक्ती आदेश देणे कामी येणारा खर्च मा.महिला व बालकल्याण निधीतुन केला जातो. साधारणत: पुढील नियुक्ती आदेशाच्या कालावधीतील मानधन खर्च अंदाजीत रक्कम रुपये ११०००००/- (अकरा लक्ष) असुन सदरचे खर्चास व मानधन तत्वावरील नियुक्ती आदेश होणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव:- विषय क्र.१५)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.९/४/२०१८ ते दि.१५/०४/२०१८, दि.१६/०४/२०१८ ते दि.२२/०४/२०१८, दि.२३/०४/२०१८ ते दि.२९/०४/२०१८, दि.३०/०४/२०१८ ते दि.०६/०५/२०१८, दि.०७/०५/२०१८ ते दि.१३/०५/२०१८ व दि.१४/०५/२०१८ ते दि.२०/०५/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.९/४/२०१८ ते दि.१५/०४/२०१८, दि.१६/०४/२०१८ ते दि.२२/०४/२०१८, दि.२३/०४/२०१८ ते दि.२९/०४/२०१८, दि.३०/०४/२०१८ ते दि.०६/०५/२०१८, दि.०७/०५/२०१८ ते दि.१३/०५/२०१८ व दि.१४/०५/२०१८ ते दि.२०/०५/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- अड पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र.१६)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

१) प्रशासकीय आदेश क्रं.सा.बां./१०८ दि.०१/११/२०१८ अन्वये महारष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्र.क्रं.१७ गजानन हौ.सोसा. मेहरुण स.नं.४८१/१ मधील ओपन स्पेसला चेनलिंग फेन्संग व लोखंडी गेट बसविणेकामी मक्तेदार श्री पुष्पेशकुमार विलास पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १३.२% कमीचे दर स्विकारुन रु.७,२९,००४ -/मात्र खर्चाची संविदा.

२) प्रशासकीय आदेश क्रं.सा.बां./९१ दि.०६/०९/२०१८ अन्वये अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.३२ मध्ये बागवाण यांच्या घरापासुन ते इकबाल कॉलनी पुलापर्यंत नाल्याला लागुन संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे वाटाघाटीअंती निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकारुन रु.९,८३,४२० -/मात्र खर्चाची संविदा.

३) प्रशासकीय आदेश क्रं.सा.बां./१६ दि.०३/११/२०१८ अन्वये जळगांव शहरातील २४ चौकातील स्वयंचलित वाहतुक नियंत्रक देखभाल व दुरुस्ती कामाचा एक वर्षासाठी वार्षीक मक्ता (AMC) देणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजीत रक्कमेपेक्षा ०.८८% कमी दर स्विकारुन रु.७,२०,००० -/मात्र खर्चाची संविदा.

४) प्रशासकीय आदेश क्रं.सा.बां./१११ दि.२९/११/२०१८ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्र.क्रं.१३ गट नं.३ व ४ येथे साईबाबा कॉलनी परिसर व गट नं.५१/१ अष्टभुजा नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.सुनिल एन.पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९% कमीचे दर स्विकारुन रु.१४,८४,४६४/- मात्र खर्चाची संविंदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- कापासे मयुर चंद्रकांत**
**अनुमोदक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**

येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**